| | |
|---|---|
| MHPU120002882020 | **नियमित दिवाणी दावा क्र. ४६/२०२०**<br>**आदेश निशाणी क्रमांक १४९**<br>**(सुभद्राबाई उर्फ शकुंतला शिवाजी तरस वि. अमर किरण बालघरे )** |

वादी यांनी प्रस्तुचा अर्ज मयत प्रतिवादी क्र. १२ शशिकांत वसंत उमाप यांचे विरोधात झालेला अबेटमेंट आदेश रद्द करण्याकरीता दाखल केला आहे.

**२.** वादी यांचे कथन आहे की, प्रस्तुतचा दावा प्रलंबित असतांना प्रतिवादी क्र. १२ शशिकांत वसंत उमाप हे दिनांक १३/१०/२०२५ रोजी मयत झाले. सदर प्रतिवादी मयत झाल्यानंतर त्यांचे कायदेशीर वारस रेकॉडवर घेणेकामी विलंब झालेला आहे. प्रस्तुत दावा हा सदरील प्रतिवादींचे विरुध्द तांत्रीकदृष्टया अबेट झालेला आहे. सदरील अबेटमेंटचा आदेश रद्द होणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

**३.** प्रतिवादी क्र. १ ते ३, ६, ७अ ते ७क यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध केलेला आहे. वादी यांनी प्रतिवादी क्र. १२ यांचे निधन झाल्यानतर ९० दिवसांचे आत वारस रेकॉर्ड वर घेण्याचा अर्ज दाखल केलेला नाही. त्याचप्रमाण अर्जाच्या पृष्टयथ प्रतिज्ञापत्र देखिल दाखल केलेले नाही. सदरचे प्रतिवादी यांचे विरुध्द सदरचा दावा अवसान झाला आहे. त्यामुळे त्यांनी अर्ज नामंजुर करण्याची विनंती केलेली आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र. १७ ते २० यांनी देखिल त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध केलेला आहे. त्याच्या कथनाप्रमाणे सदर अर्जास विलंब झाल्याने

सदर अर्ज चालण्यास पात्र नाही. सबब, त्यांनी अर्ज नामंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

**४.** अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा वादी यांनी वाटप, ठराव व निरंतरचे ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. सबब, दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेकरीता प्रतिवादी यांचे वारस अभिलेखावर येणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादी यांचे वारस अभिलेखावर घेतल्यामुळे उर्वरीत प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. त्याचप्रमाणे वादी यांनी प्रतिज्ञापत्र दाखल करुन प्रतिवादी क्र. १२ हया मयत झाल्याचे परंतु त्यांचा मृत्युदाखला उपलब्ध होत नसल्याचे कथन केलेल आहे. सबब मी, खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**- आ दे श -**

| |
|---|
| वादीचा अर्ज (नि.१४९ ) मंजुर करण्यात येत आहे. |

SHASHANK DIVAKAR SHIRSAT

Digitally signed by SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Date: 2026.08.17 17:40:02 +0530

ठिकाण – भोर ( एस.डी.शिरसाट )

दिनांक - १७.०८.२०२६ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,

भोर.